महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय (विस्तार) दालन क्र. १४०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई:-४०० ०३२

---

क्रमांक:-बीसीएच-२०२४/प्र.क्र. २८५/शिक्षण-२ दिनांक. २ सप्टेंबर, २०२४

दरपत्रक सूचना

विषय:- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या शासकीय निवासी शाळा, अनुसूचित जाती अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा, महामंडळे यामधील पायाभूत सुविधांची तपासणी करण्याच्या अनुषंगाने "वसतिगृहे आश्रमशाळा महा-निरीक्षण" कार्यप्रणाली विकसित करणेबाबत.

१. खरेदीची व्याप्ती:-

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणासाठी एकूण ४४३ शासकीय वसतिगृहे, स्वयंसेवी संस्था संचलित २३८८ अनुदानीत वसतीगृहे, अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलां-मुलींसाठी एकूण ९३ शासकीय निवासी शाळा, १९ अनुसूचित जाती अनुदानित आश्रमशाळा, सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा, दलित वस्ती योजना, मातोश्री वृध्दाश्रम, सहकारी सुतगिरणी संस्था, अनुसूचित जाती सहकारी संस्था, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,महात्मा फुले विकास महामंडळ, संत रविदास चर्मकार विकास महामंडळ, कै. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ या संस्थामधील पायाभुत सुविधांची तपासणी करण्याच्या अनुषंगाने "वसतिगृहे आश्रमशाळा महा-निरीक्षण" कार्यप्रणाली विकसित करण्याकरिता मोहोरबंद लिफाफ्यामध्ये इच्छुक पुरवठादार/प्राधिकृत वितरक/विक्रेते यांच्याकडून सोबत जोडलेल्या स्पेशिफिकेशननुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२. दरपत्रक सादर करावयाचा दिनांक:-

मोहोरबंद लिफाफ्यातील दरपत्रके अवर सचिव (शिक्षण-२), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पहिला मजला, (विस्तार इमारत), मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांच्या नावे दि.१८.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पाठवावेत अथवा प्रत्यक्ष सादर करावेत.

मोहोरबंद लिफाफ्यावर ठळक शब्दात "वसतिगृहे आश्रमशाळा महा-निरीक्षण कार्यप्रणाली विकसित करणे" असे नमूद करावे.

आपली,

(प्रज्ञा देशमुख)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. संचालक,माहिती व तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय,मुंबई,
२.कक्ष अधिकारी (संगणक कक्ष) सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई,